Volume-2, Issue-1, Febuary 2019




# Anekant Journal of
# Humanities and Social Sciences

# ‘अनसूयाबाई आणि मी’ एक स्त्रीवादी पहाणी

‘अनसूयाबाई आणि मी’ हे पु.बा काळे यांचे आत्मचीरत्र आहे. त्यांनी स्वतःचे कर्तृत्व सांगण्यासाठी,आत्मचित्र काढण्यासाठी हे आत्मचरित्र लिहिले नसून पत्नीचे स्वभावचित्र काढण्यासाठी लिहिले आहे.याच्या प्रस्तावनेत त्यांनी म्हंटल्याप्रमाणे ‘ गाडयाबरोबर नळयाची यात्रा’या न्यायाने अनसूयाबाईच्या चरित्राबरोबर त्यांचेही आत्मचरित्र ओघाओघाने आले आहे.त्यांचे वरील उद्‌गार विनयाचे किंवा नम्रतेचे नसून खरेच आहेत.या आत्मचरित्रातून काळे यांच्यापेक्षा त्यांच्या पत्नीचे, अनसूयाबाइंचे व्यक्तीमत्व आपल्या मनात ठसते.पुरूषप्रधान पुरूषकेंद्री विचारचौकटीने स्त्रीकडे नेहमी अभाववादी दृष्टीने पाहिलेले आहे.या आत्मचरित्रात काळे यांनी स्वतःला केंद्रस्थानी न ठेवता पत्नीला केंद्रस्थानी ठेवले आहे.आत्मचरित्रभर काळे यांचे विचार आणि वर्तन स्त्रीवादीविचारांच्या जवळ जाणारे आहे असे दिसून येते.

काळे यांचे अनसूयाबाईशी लग्न होण्यापूर्वी एक लग्न झाले होते.इ.स.**1913** मध्ये त्या पत्नीचा मृत्यू झाला.त्यानंतर त्यांच्या आईने आग्रह करूनही त्यांनी लग्नास नकार दिला.सन**1914**मध्ये अनसूयाबाईनी फर्ग्युसन कॉलेज मध्ये प्रवेश घेतला तेव्हा काळे तेथेच शिकत होते.कॉलेजमध्येच त्यांची प्रथम दृष्टादृष्ट झाली.नंतर काळे यांच्या चुलतबहिणीच्या मध्यस्थीने त्यांनी अनसूयाबाईशी पत्रव्यवहार सुरू केला पण त्यात अनसूया प्रेमाचा अंकूर अभिव्यक्त करणे टाळायची.तिचे लग्न तिच्या भावाने एका गृहस्थाशी ठरवले.त्यामुळे त्यांचा पत्रव्यवहार बंद पडला.तिचे लग्न ठरल्यामुळे काळे निराश झाले.दुर्स या मुलीशी लग्न करायचे नाही असा निश्चय करून त्यांनी सैन्यात कमिशन मिळवण्याचा प्रयत्न केला.ते न जमल्यामुळे अमेरिकेला स्थायिक होण्याचा विचार केला.तिच्या भावानेच ते लग्न मोडले.अचानकपणे **1916** मध्ये त्यांचे अनसूयाबाईशी लग्न ठरले. अनसूया सुंदर नव्हती.तिचा वेषही गबाळा असे.ती हेडस्ट्रॉंग मनस्वी,होती.तसेच तिच्या मानअपमानाच्या कल्पना विलक्षण होत्या याची कल्पना असूनही काळे यांनी तिच्याशीच लग्न करण्याचे ठरवले.

लग्नानंतर बाईची मनःस्थिती नॉर्मल नसल्याने त्यांना घेउन काळे नोकरीच्या गावी बंगलोरला गेले.तेथे महिना दीड महिना सुखाचा गेल्यावर बाईना डोहाळे लागले.त्यात त्यांचा ॲवसेंन्स विल पॉवर हा रोगे उचल खातो.या काळात ते बाईचा विक्षिप्तपणा सहन करतात.या काळात त्या कोणालाही न सांगता धारवाड,बेळगाव,पुणे नाशिकला जातात.काळे यांची आई आणि मामा त्यांना परत बंगलोरला आणतात .पुण्यात त्यांना मुलगा झाला.तेव्हा कोणाला न सांगता चवथ्या दिवशी त्या काळे यांना शोधण्यासाठी पर्वतीकडे पायी जातात.काळे तेव्हा जमशेटपूरला होते.तेथून त्यांना कसेबसे घरी आणतात.तो मुलगा दोन आठवडयात गेल्यावर पूर्ण वर्षभर त्या आजारी पडतात.तेव्हा काळे यांची आई तो आजार काढते.काळे यांना शिव्या शाप देणे,नीरांजन फेकून मारणे,पुन्हा दिवस गेल्यावर डोहाळयात कुणालाही अव्दातव्दा बोलणे,मुलाच्या मुंजीकरता आलेल्या

पाहुण्यांना त्यांच्या अपरोक्ष सरबत केल्यावर (असे सरबत करणे म्हणजे )आपला अपमान झाला असे वाटून सर्व पाहुण्यांना बोलणे,त्यांच्या लग्नाच्या वेळी चांदीची भांडी गहाण ठेऊन त्यांना लग्नसोहळा साजरा करावा लागला होता . त्यामुळे लग्नाच्या सिल्वर ज्युबिलीला काळे यांनी नवीन चांदीची भांडी भेट दिल्यावरही मनावर ताबा न ठेवता त्या रडारड करणे . यासारखे वर्तन केल्याने शेवटी नाईलाजाने त्यांना पुण्याच्या मेंटल हॉस्पीटल मध्ये ठेवतात . जमशेटपूरला गेल्यावरही अनसूयाबाईना संतापाचे झटके येत असत . यासारखा विक्षिप्तपणा काळे सहन करतात .

अनसूयाबाईना अवांतर गोष्टीकडे लक्ष दयायला आणि मनःसंताप होण्याला अवकाश मिळू नये म्हणून काळे त्यांना आदिवासी मुलामुलींची शाळा चालविण्यास प्रोत्साहन देतात . त्यांचा हा सार्वजनिक कामाचा संबंध **1920**च्या जानेवारीत तुटतो . पण संधी आल्यावरही बाई मध्यप्रांत लेजिस्लेटीव्ह कौन्सिलवर स्त्री सभासद म्हणून जाण्यास नकार देतात . तेव्हा काळे त्यांना तयार करतात . यानंतर त्या सार्वजनिक कामात रमून जातात . गांधीजीनी मीठ सत्याग्रहाकरीता प्रत्येक कुटुंबातून एक शिपाई देण्याचे आवाहन केले तेव्हा काळे या लढयात भाग घेण्याची इच्छा व्यक्त करताात . बाईंनी त्याला विरोध करून स्वतः जाण्याचा विचार मांडल्यावर शेवटी पंधरा दिवस विचार करून काळे यांनी धंदयात रहायचे आणि बाईंनी लढयात जायचे ठरवतात . **1952**च्या पार्लमेंटच्या निवडणुकीसाठी उभे राहण्यास काळे त्यांना प्रोत्साहन देतात . प्रचारात मदत करतात . त्यात त्या निवडूनही येतात . **1957**च्या पार्लमेंटच्या निवडणुकीतही काळे त्यांना मदत करतात . **1967**मध्ये इलेक्शन एजंट म्हणून काम पाहून त्यांना निवडून आणतात .

आपल्या पत्नीला मनःसंताप होण्यास वेळ मिळू नये म्हणून काळे पत्नीच्या कर्तृत्वाला वाव देताना दिसतात . गांधीजीच्या आवाहनानंतर स्वातंत्र्य लढयात जाण्याची त्यांची स्वतःची इच्छा असली तरी बाईंच्या म्हणण्याला मान देऊन स्वातंत्र्य लढयात जाण्यास परवानगी देतात . त्यात त्यांना सर्वपरीने सहकार्य करतात . कॉग्रेसचा प्रचार करताना खेडेगावातून परत यायला बाईंना रात्रीचे दोन दोन वाजत तेव्हा ते ‘त्यांचे आणि माझे कार्यक्षेत्र बदलले होते . त्याचे परिणाम भोगायला आम्ही दोघेही तयार होतो . ’असा समजूतदारपणा दाखवतात .

त्यांचे लग्न झाल्यानंतरच्या काळात त्यांची आर्थिक स्थिती हालखीची होती . अनसूयाबाईच्या आजारामुळे त्या काळे म्हणतील त्याला कबूल होत होत्या . हे योग्य नाही याची जाणीव काळे यांना होती . ते म्हणतात,मला त्यांचे स्वत्व मारायचे नव्हते . पण मी तरी काय करू शकत होतो?कारण आर्थिक परिस्थितीने मला अगदी भंडावून सोडले होते . आमचे नातेवाईक आम्हाला हिडीसफिडीस करत होते . कुणाहीकडे स्वागत होत नव्हते . आम्ही जगात एकटे पडलो होतो...’ हे सांगत असताना त्यांच्या मनात पत्नीच्या मताला स्वतंत्र किंमत देण्याची,त्याची कदर करण्याची खरेच इच्छा होती असे

दिसून येते . त्यामुळे ते वरीलप्रमाणे पत्नीच्या कर्तृत्वास वाव मिळण्यासाठी प्रयत्न करतात ,मदत करतात .

एवढयावरच न थांबता ते त्यांच्या कर्तृत्त्वाचे कौतुकही करतात . त्यातूनच पिकेटींग करताना पकडले जाउन अनसूयाबाईंना झालेली शिक्षा ,चिमूरच्या दंगलीतील भीतिग्रस्त स्त्रियांना धीर देउन त्यांच्यासाठी जमेल तेवढी गोळा केलेली मदत, नागपूरच्या दंगलीतील प्रकरणात ज्यांना फाशी झाली असेल त्यांच्यासाठी फाशी निवारक समितीकरता निधी जमवण्याकरता केलेले प्रयत्न , आपले सर्व प्राण आणि शक्ती पणास लाउन त्यांनी सात जणांची फाशी माफ करून घेणे, महिला परिषदेच्या अध्यक्षपदावरून संततीनियमन आणि सोशल अफेयर्स करिता पोर्टफोलीयो नेमण्याच्या समस्येला वाचा फोडणे यासारख्या कर्तृत्वाचे कौतुक करतात .

तळेगावला असताना बाईंनी विहिरीचे पाणी काढणे,स्वयंपाक करणे,भांडी घासणे ही कामे कोणतीही कुरकर न करता केली तसेच त्या स्वयंपाक करण्यात निष्णात असून त्यांना स्वयंपाकाची आवड होती, प्रकृतीने सुदृढ असून **1920** नंतर त्यांना आजार माहिती नव्हता ,त्या अत्यंत हलक्या मनाच्या होत्या,मनाच्या शुध्द व प्रेमळ होत्या अशा परंपरेने स्त्रियांसाठी सांगितलेल्या गुणांचा उल्लेख करतात . तसेच परंपरेने स्त्रियांसाठी नाकारलेल्या गुणांचाही उल्लेख काळे करतात . त्यात त्या हेडस्ट्रॉंग ,मनस्वी,तापट,मनासारख्या गोष्टी झाल्या नाहीत तर तोल सुटणे,टापटीपीने व निटनेटके राहणे न जमणे,पुरूषांशी बोलण्यात आत्मविश्वास,कलाकुसरीच्या कामात नावड,विणण्या शिवण्याचा कंटाळा,उत्तम अस्खलीत बोलणे,कोणाच्या आहारी न जाता फटकून बोलणे व वागणे,तोंडाच्या फटकळ,संततिनियमनासारख्या विषयावर गांधीजींशी धीटपणे बोलणे यासारख्या गुणांचा उल्लेख करतात . त्याच बरोबर त्यांची प्रसिध्दीपराङ्ःमुखता,न्यायाच्या बाबतीत तंतोतंतपणा, त्यांचा मातेचा पिंड याचा उल्लेख करतात . त्या तुरूंगात असताना तेथे मिळणारे दूध त्या धाकटया मुलांसाठी ठेवत आपल्या सार्वजनिक कामामुळे मुलांकडे आपले दुर्लक्ष होते असे त्यांना वाटे . अभ्यंकरांनी त्यांच्याकडून राजकारणात अपेक्षा केल्यावर ‘मी स्त्री आहे म्हणजे माझे मातेचे कर्तव्य मला प्रथम पार पाडले पाहिजे . ते साधून जे काय राजकारण किंवा समाजकारण करता येईल तेवढेच मी करीन . त्यामुळे मी राजकारणात पुढे नाही आले तरी चालेल . मी फक्त शिपाई म्हणून राहण्यास तयार आहे . असे बाईंनी अभ्यंकरांना दिलेले उत्तर उल्लखेतात . परंपरेने स्त्रियांसाठी सांगितलेल्या आणि नाकारलेल्या गुणांची ते सहजपणे नोंद करतात . त्यात कोणताही अभिनिवेश दिसत नाही किंवा अनसूयाबाईंनी ते बदलावेत असाही त्यांचा आग्रह नाही .

पत्नीला एक व्यक्ती म्हणून,माणूस म्हणून स्वीकारण्याची त्यांची तयारी दिसते . म्हणूनच ते बाईंना आर्थिक स्वातंत्र्य मिळण्यासाठी त्यांच्या नावाने घर घेतात . काळे फाउंडेशन ट्रस्टच्या त्या पगारी मॅनेजिंग ट्रस्टी होत्या . बाईंना आर्थिक स्वातंत्र्य देतातच . शिवाय त्यांच्या तुलनेत आपल्यातील

कमीपणा मान्य करतात. बाईच्या माहेरच्या तुलनेत आपल्या घरात फारसे कोणी शिकलेले नव्हते. त्यामुळे आपल्यापेक्षा बाईची संस्कृत, मराठी, इंग्रजी वाङ्‌मयातील झेप फार मोठी होती,वाङ्‌मयीन रसास्वाद बाईच्या बरोबरीने घेण्यास आपण असमर्थ होतो,बाई उत्तम अस्खलित बोलर्णा या वागण्यात हुशार, सहसा कोणाच्या आहारी न जार्णा या, प्रसंगी फटकून बोलर्णा या ,आपण बोबडे, उधळे असा कमीपणा मान्य करताात. पत्नी आपल्यापेक्षा गुणात वरचढ आहे हे मान्य करतातच शिवाय या वरचढ गुणांचे त्यांना कौतुक वाटते.

परस्पर विरोधी आचारविचारांमुळे त्यांची नेहमी भांडणे होत असत. असे असतानाही काळे यांची देशसेवेची इच्छा पूर्ण करण्याकरता सर्व नातेवाईक विरूध्द असूनही बाई त्यांना प्रोत्साहन देतात. लग्नाच्या पहिल्या चार वर्षात आजार, हालअपेष्टा यातून तावूनसुलाखून बाहेर पडल्यावर त्यांच्या व्यक्तीमत्वाचा काळे यांच्यावर प्रभाव पडू लागला. प्रथमदर्शनी प्रेमातून त्यांनी अनसूयाबाईंशी लग्न केले तरी नंतर त्यांच्या सहवासातून प्रेम निर्माण झाल्याचे दिसते. पुरूषवर्ग स्त्रियांची कुचेष्टा करतो. स्त्रीवरून शिवीगाळी करतो याचा बाईंना राग होता. स्त्रीला स्वतःचे अस्तित्व, मन, आशाआकांक्षा असतात. त्या तिने संसार सांभाळून पूर्णत्वाला नेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याकरता तिला व्यवहार समजला पाहिजे. तिने स्वतःचा निर्णय घेण्याची शक्ती कमावली पाहिजे आणि स्वतःचे अस्तित्व आपल्या घरच्या मंडळींना जाणवून दिले पाहिजे. या अनसूयाबाईच्या स्त्रीवादाशी जुळर्णा या मताचा काळे आदर करतात. अभ्यंकरांनी अनसूयाबाईंना राजकारणात पूर्ण वेळ काम करण्याची गळ घालण्याचे काम काळे यांना सांगितले तरी ते बाईच्या त्यासाठी असलेल्या नकाराचा आदर करतात.

अनसूयाबाईच्या कॉंग्रेसमधील कार्याचा आढावा घेताना बाईंनी कॉंग्रेसमध्ये कार्य केले तरी मध्यमवर्गीय पांढरपेशा स्त्री कार्यकर्त्यांना त्या कॉंग्रेसमध्ये ओढू शकल्या नाहीत असे काळे म्हणतात. यावरून एखादया घटनेबद्दल सारासार विचार करण्याची ,गुणांबरोबर त्यांची उणीव दाखवणे ही त्यांची समतोल वृत्ती दिसते. त्यांच्या पुरूष सहर्का याविषयी काळे आदराचे उद्‌गार काढतात. त्यांच्या मित्रांशी सलोख्याचे संबंध ठेवतात. बाईचा मत्सर करणारे पुरूषही आहेत याची नोंद घेतात. काही प्रसंगी आपण उदार मनाचे आहोत असे दाखवण्याचा प्रयत्न करतात. उदाहरणार्थ अभ्यंकरांच्या शेवटच्या आजारपणातील प्रसंग.

पत्नीच्या कर्तृत्वास वाव देणारे,ती राजकारण, समाजकारणात पडल्यावर सर्व र्त हेची मदत करणारे ,बाईच्या स्त्रीवादी विचारांशी जुळर्णा या मतांचा आदर करणारे ,मुलाच्या औरसपणाबद्दल बाईशी वाद घालणारे, स्त्रीवादी विचारांशी साम्य असर्णा या काळे यांना पारंपरिक पुरूषी अहंकार काही प्रमाणात आढळतो. स्त्रियांना आदर देण्याचे त्यांचे कारण स्त्रीवाद विरोधी असल्याचे दिसते. लग्नानंतर सतत कडाक्याची भांडणे होउनही एकमेकांवरची प्रीती कायम होती याचे कारण ते त्यांना आपली देवता समजत होते म्हणून आपले प्रेम कायम राहीले. असे ते म्हणतात. परंपरागत स्त्री पुरूष कल्पनेमध्ये

स्त्रीला देवता कल्पून तिची पूजा केली जाते या विचारसरणीचा प्रभाव त्यांच्यावर दिसतो. कुटुंबनियोजन करण्यामागची त्यांची वृत्ती पाहिली तर बाईंना सार्वजनिक काम करण्याची तळमळ होती म्हणून काही साधने वापरली तरी नंतर मात्र जास्त मुले नकोत, देशाचे दुर्दैव व दारिद्रय यांचा प्रभाव पडून ते संततिनियमनाची शस्त्रकिया करताना दिसतात. बाईंच्या शेवटच्या आजारात त्यांची शुश्रुषा करण्याची संधी मिळाली असे म्हणतात. खरे तर सहधर्मचारिणी या नात्याने ते त्यांचे कर्तव्यच होते पण येथे ते शुश्रुषेचे श्रेय स्वतःकडे घेतात. काळे यांच्या व्यक्तिमत्वात अशी विसंगती दिसून येते कारण ते ज्या काळात वावरले त्या काळात आजच्या स्त्रीवादी विचारांचा उगमही झालेला नव्हता. समाजसुधारकांनी उच्चवर्णीय स्त्रियांच्या उध्दारासाठी म्हणून इंग्रजी शिक्षण व विचारामुळे स्त्रियांना मदत करण्यास सुरूवात केली होती. त्यात त्यांच्या उध्दाराची भावना असली तरी स्त्रीपुरूष समानतेची भावना नव्हती. केशवपन, बालविवाह, विधवांच्या पुर्नविवाहास उत्तेजन, स्त्रियांच्या शिक्षणास उत्तेजन देणे असा मर्यादित हेतू त्यामागे होता. परंतु स्त्रियांकडे देवता म्हणून पाहण्याची पारंपरिक दृष्टी मात्र बदलली नव्हती. अशा काळात आपल्या पत्नीच्या मनाचा,मतांचा विचार करून तिच्या कर्त ृत्वास प्रोत्साहन देणारे वाव देणारे काळे त्यांच्या काळाच्या पुढेच गेले आहेत असे दिसते. त्या वेळची परिस्थिती लक्षात घेता पत्नीच्या परंपरेच्या दृष्टीने स्त्रीस्वभावास न शोभर्णा या गुणांचे कौतुक करून त्यांच्या व्यक्तिमत्वास खीळ न घालता ते फुलवण्याची त्यांची वृत्ती कौतुकास्पद आहे.

'माझी भूमिका' मध्ये ते म्हणतात "पत्नीने जर पतीकडे आपला अन्नदाता रक्षक किंवा मुलांचा जनक याच नात्याने केवळ पाहिले तर वैवाहिक जीवनात कधी गोडी उत्पन्न होणारच नाही. आपल्या पतीची आपण अर्धांगी आहोत म्हणजेच आपले आणि त्याचे नाते बरोबरीचे आहे, अशी तिची भावना असायला हवी. तसेच नर्व याने आपल्या बायकोला रखेली दासी किंवा गुलाम आहे असे समजता कामा नये. लग्न होण्यापूर्वी पतीपत्नीचे संबंध आणि वैवहिक जीवन यांच्यासंबंधी माझी धारणा अशा प्रकारची होऊन गेली होती."यावरूनही काळे यांची वृत्ती स्त्रीवादाशी बरीचशी मिळतीजुळती असल्याचे दिसून येते.

काळे पु. बा. अनूसयाबाइ आणि मी संपादक सुरेश डोळके स्वतः **1962**

डॉ. रंजना नेमाडे